मुंबई उपनगर जिल्हा

**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी**

प्रसिद्धी माध्यम कक्ष

दूरध्वनी क्र. :- ०२२-२६४० ११५६, ई-मेल संपर्क:- mumbaisuburbanmediacell@gmail.com

जा.क्र. १३५ /प्रसिद्धी माध्यम/प्रेस नोट/२०१९, दि.२७/०४/२०१९

प्रेस नोट

# मुंबई उपनगर जिल्ह्यात ६५ 'क्रिटिकल मतदान केंद्र'

## क्रिटिकल मतदान केंद्रांवरील घडामोडींवर वेबकास्टिंगद्वारे ठेवणार लक्ष

## सदर ६५ मतदान केंद्रांवर असणार चोख सुरक्षा व्यवस्था

मुंबई, दि. २७ एप्रिल २०१९: **'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक - २०१९' बाबत उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार मतदार संघ, मतदान केंद्र, मतदार संख्या व उपलब्ध भौगोलिक क्षेत्र यांचा विचार करता मुंबई उपनगर जिल्हा हा संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे. याच जिल्ह्यात येत्या सोमवारी म्हणजेच दिनांक २९ एप्रिल २०१९ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ६ या अकरा तासांच्या कालावधी दरम्यान मतदान होणार आहे. या अनुषंगाने मा. भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार गेल्यावेळच्या मतदानासंबधीच्या माहिती विश्लेषणाच्या आधारे मुंबई उपनगर जिल्ह्यातील ६५ मतदान केंद्रे ही यंदाच्या मतदान प्रक्रियेदरम्यान 'क्रिटिकल' असल्याचे निश्चित करण्यात आले आहे. या सर्व मतदान केंद्रांवर मतदानाच्या दिवशी विशेष सुरक्षा व्यवस्था असण्यासह तेथील घडामोडींवर काटेकोरपणे लक्ष ठेवता यावे, यासाठी या केंद्रांवर घडामोडींचे अंतर्गत स्तरावर थेट 'वेबकास्टिंग' व 'रेकॉर्डिंग' करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या सर्व मतदान केंद्रांवर पोलीस दलासह केंद्रिय औद्योगिक सुरक्षा दलाचे सशस्त्र कर्मचारी देखील तैनात असणार आहेत, अशी माहिती मुंबई उपनगर जिल्ह्याच्या प्रसिद्धी माध्यम कक्षाद्वारे देण्यात आली आहे.**

'लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९' च्या पार्श्वभूमीवर मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनांनुसार आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात सर्वस्तरीय कार्यवाही सुरु आहे. याच अनुषंगाने दिलेल्या सुचनांनुसार गेल्या निवडणुकीत ज्या मतदान केंद्रांवर ७५ टक्क्यांपेक्षा अधिक

मतदान झाले होते, किंवा ज्या केंद्रांवरील मतदानाच्या ७५ टक्के मतदान एकाच उमेदवारास झाले होते, अशी मतदान केंद्रे 'क्रिटिकल' म्हणून निश्चित करण्यात येतात. तसेच गेल्या मतदानाच्या वेळी असलेली कायदा व सुव्यवस्था विषयक परिस्थिती अशा बाबींच्या आधारावर या मतदान केंद्राचे निर्धारण करण्यात येते.

**वरील नुसार मुंबई उपनगर जिल्ह्यातील ६५ मतदान केंद्रे ही 'क्रिटिकल मतदान केंद्र' म्हणून निर्धारित करण्यात आली आहेत. यामध्ये मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातील ८, मुंबई उत्तर पश्चिम (वायव्य) लोकसभा मतदार संघातील १३, मुंबई उत्तर पूर्व (ईशान्य) लोकसभा मतदार संघातील १४ मतदान केंद्रांचा समावेश आहे. तर उत्तर मध्य लोकसभा मतदार संघात क्रिटिकल मतदान केंद्र नाहीत. त्याचबरोबर दक्षिण मध्य लोकसभा मतदार संघातील दोन विधानसभा मतदार संघांचा समावेश हा मुंबई उपनगर जिल्ह्यात असून तेथील ३० मतदान केंद्रे ही 'क्रिटिकल मतदान केंद्र' म्हणून निर्धारित करण्यात आली आहेत.**

क्रिटिकल मतदान केंद्रांबाबत मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनांचे सुयोग्यप्रकारे पालन करता यावे, यासाठी विशेष व अतिरिक्त व्यवस्था असणार आहे. या अंतर्गत सर्व ६५ मतदान केंद्रांवरील घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी अंतर्गत स्तरावर थेट 'वेब कास्टिंग' (Live Webcasting) व 'रेकॉर्डिंग' करण्यात येणार आहे. या 'लाइव्ह वेबकास्टिंग'वर जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी आणि वरिष्ठ पोलीस अधिका-यांची नजर राहणार असून काही अनुचित प्रकार आढळल्यास संबंधित पथकांद्वारे तात्काळ कारवाई केली जाणार आहे. त्याचबरोबर मतदान केंद्रावर व केंद्रांपासूनच्या १०० मीटरच्या सीमा रेषेवर अतिरिक्त पोलीस कुमक व सुरक्षा कर्मचारी असणार आहेत. तसेच केंद्रिय औद्योगिक सुरक्षा दलाचे जवान देखील या मतदान केंद्रांच्या परिसरात तैनात असणार आहेत.

मुंबई उपनगर जिल्ह्यातील क्रिटिकल मतदान केंद्रांची मतदारसंघनिहाय यादी पुढीलप्रमाणे आहे:

| **लोकसभा मतदार संघ (क्रिटिकल मतदान केंद्राची संख्या)** | **विधानसभा मतदार संघ** | **क्रिटीकल मतदान केंद्र** | |
|---|---|---|---|
| | | **क्रमांक** | **ठिकाण** |
| 26- मुंबई उत्तर (8) | 152-बोरीवली | निरंक | निरंक |
| | 153-दहिसर | 45 | तारे मार्ग म्युनिसिपल मराठी शाळा, तळ मजला, रूम नं. 2 |
| | | 121 | मेरी ईमाकुलेट हायस्कूल, 1 ला मजला, रूम नं.6 |
| | 154-मागाठणे | 96 | युनिव्हर्सल स्कूल, 1 ला मजला, रूम नं. 102 |
| | | 174 | योजना विदयालय, पेंडल नं. 6 |
| | 160 - | 74 | पाल राजेंद्र इंग्लिश हायस्कूल, लेफ्ट साईट बिल्डींग नं. 1, तळ |

| | | | |
|---|---|---|---|
| | कांदिवली | | मजला, रूम नं. 8 |
| | | 201 | नवजीवन स्कूल, नवीन बिल्डींग, तळ मजला, रूम नं. 7 |
| | 161 -चारकोप | 132 | महाराष्ट्र एज्युकेशन वेल्फेअर ट्रस्टच्या समोर, मोकळी जागा, गरूडा पेट्रोल पंपाच्या जवळ, कांदिवली (प.) |
| | | 181 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल, गणेश नगर, 60 फिट रोड, कांदिवली (प.) |
| | 162-मालाड (पश्चिम) | निरंक | निरंक |
| 27-**मुंबई उत्तर पश्चिम (वायव्य)** (13) | 158 - जोगेश्वरी (पूर्व) | 96 | आरे कॉलनी, पेंडल ऑन ओपन पेस, पिकनिक पॉईंट-L कॅंटिनच्या जवळ |
| | | 166 | सेंट मेरी प्रायमरी हायस्कूल, 1 ला मजला, रूम नं. 11 |
| | 159-दिंडोशी | 169 | क्वीन मेरी हायस्कूल, 1 ला मजला, रूम नं. 9 |
| | | 194 | डिविन चाईल्ड हायस्कूल, 1 ला मजला, रूम नं. 9 |
| | 163-गोरेगांव | 182 | पहाडी म्युनिसिपल प्रायमरी हायस्कूल, तळ मजला, रूम नं. 4 (इंग्लिश सेक्शन) (नॉर्थ साईड), गोरेगांव (पूर्व) |
| | | 277 | मोतिलाल नगर म्युनिसिपल उच्च प्राथमिक शाळा, पेंडल ऑन ओपन ग्राऊंड, गोरेगांव (प.) |
| | 164-वर्सोवा | 7 | सिटी इंटर्नल स्कूल, 1 ला मजला, रूम नं. 3, न्यु लिंक रोड, ओशिवरा, जोगेश्वरी (प.), मुंबई-102 |
| | | 217 | वर्सोवा वेल्फेअर असोसिएशन हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, तळ मजला, रूम नं. 1, आराम नगर-अे.जे.पी. रोड, अंधेरी(प.) |
| | | 256 | गायनकेंद्र हायस्कूल, तळ मजला, प्रायमरी सेक्शन, रूम नं. 6 |
| | 165-अंधेरी (पश्चिम) | 281 | मंडप-5, मुल्जीभाई माधवनी, गर्ल्स हायस्कूल, ओपन स्पेस |
| | | 199 | विदयानिधी हायस्कूल, 1 ला मजला, रूम नं. 9 |
| | 166-अंधेरी (पूर्व) | 108 | एम्प्लॉइज स्टेट इन्सुरन्स कॉर्पोरेशन रिजनल ऑफिस, बिल्डींग स्टील्ट - E |
| | | 237 | पेंडॉल ऑन ओपन स्पेस ऑफ शेख शामसुद्दीन मार्ग, काजूवाडी |
| 28-**मुंबई उत्तर पूर्व (ईशान्य)** (14) | 155-मुलुंड | 218 | गोशाळा म्युनिसिपल उच्च प्राथमिक शाळा, 1 ला मजला, खो.क्र.11, गोशाळा मार्ग, मुलुंड (प.) |
| | 156-विक्रोळी | निरंक | निरंक |
| | 157-भांडूप (पश्चिम) | 20 | आयडियल इंग्लिश हायस्कूल, तळ मजला, खो.क्र.1, दर्गारोड, तुळशेत पाडा, भांडूप (प.), मुंबई-78 |
| | | 250 | भांडूप पिपल्स एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, तळ मजला, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | खो.क्र.10, भांडूप प्रतापनगर मार्ग, फरीदनगर, मुंबई-78 |
| | | 164 | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मार्ग, बृ.मुं.महानगरपालिका शाळा, 1 ला मजला, रूम नं. 19, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मार्ग, ईश्वर नगर, भांडूप (प.), मुंबई-78 |
| | | 171 | सहयाद्री विदयामंदिर तळमजला, खो.क्र.1, सरदार प्रतापसिंग मार्ग, भांडूप (प.), मुंबई-78 |
| | | 269 | पवई महानगरपालिका उच्च प्राथमिक शाळा, तळमजला, खो.क्र.5, भांडूप लाल बहादुर शास्त्री मार्ग, मुंबई-78 |
| | 169-घाटकोपर (पश्चिम) | 96 | विक्रोळी पार्कसाईट म्युनिसिपल मराठी शाळा क्र. 3, 1 ला मजला, खो.क्र.42, अग्निशमन दलाच्या बाजूला, विक्रोळी (प.) |
| | | 99 | विक्रोळी पार्कसाईट म्युनिसिपल मराठी शाळा क्र. 3, 1 ला मजला, खो.क्र.46, अग्निशमन दलाच्या बाजूला, विक्रोळी (प.) |
| | 170-घाटकोपर (पूर्व) | 199 | गुरूनानक इंग्लिश स्कूल, तळ मजला, रून नं. 4 |
| | 171-मानखुर्द शिवाजीनगर | 286 | ए.आर. इस्लाम हायस्कूल, तळ मजला, रूम नं. 2, गौतम नगर, गोवंडी |
| | | 287 | ए.आर. इस्लाम हायस्कूल, तळ मजला, रूम नं. 3, गौतम नगर, गोवंडी |
| | | 289 | ए.आर. इस्लाम हायस्कूल, तळ मजला, रूम नं. 5, गौतम नगर, गोवंडी |
| | | 290 | ए.आर. इस्लाम हायस्कूल, तळ मजला, रूम नं. 6, गौतम नगर, गोवंडी |
| | | 208 | पी.एम.जी.पी. कॉलनी, ट्रांन्झिस्ट कॅम्प, बि.नं.92, तळ मजला, सोसायटी ऑफिस |
| 29- उत्तर मध्य मुंबई (0) | 167-विलेपार्ले | निरंक | निरंक |
| | 168-चांदिवली | निरंक | निरंक |
| | 174-कुर्ला (अ.जा.) | निरंक | निरंक |
| | 175-कलिना | निरंक | निरंक |
| | 176-वांद्रे (पूर्व) | निरंक | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| | 177-वांद्रे (पश्चिम) | निरंक | निरंक |
| 30- दक्षिण मध्य मुंबई (30) | 172- **अणूशक्ती नगर** | 29 | **शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि., बिल्डींग नं.** A-11, **तळ मजला, ऑफिस** |
| | | 29A | **शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि., बिल्डींग नं.** A-11, **तळ मजला, बालवाडी** |
| | | 31 | **शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि., बिल्डींग नं.** A-11, **तळ मजला, ऑफिस/वेल्फेअर सेंटर** |
| | | 38 | **शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि., बिल्डींग नं.** A-26, **तळ मजला, ऑफिस, बालवाडी** |
| | | 39 | **शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि., बिल्डींग नं.** A-26, **तळ मजला, ऑफिस** |
| | | 40 | **शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि., बिल्डींग नं.** A-28, **तळ मजला, बालवाडी** |
| | | 67 | **मानखुर्द पूर्व प्राथ. मराठी शाळा नं.** 1, **तळ मजला, रूम नं.** 3 |
| | | 68 | **मानखुर्द पूर्व प्राथ. मराठी शाळा नं.** 1, **तळ मजला, रूम नं.** 4 |
| | | 76 | **शहाजी नगर म्युनिसिपल उच्च प्राथ. तमिळ शाळा नं.** 1, **रूम नं.** 2, **तळ मजला** |
| | | 80 | **शहाजी नगर म्युनिसिपल उच्च प्राथ. तमिळ शाळा नं.** 1, **रूम नं.** 6, **तळ मजला** |
| | | 207 | **डॉ. भिमराव आंबेडकर विदयालय, रूम नं.** 1, **तळ मजला, म्हाडा कॉलनी, वाशीनाका** |
| | | 207A | **डॉ. भिमराव आंबेडकर विदयालय, रूम नं.** 4, **तळ मजला, म्हाडा कॉलनी, वाशीनाका** |
| | | 220 | **डॉ. भिमराव आंबेडकर विदयालय, रूम नं.** 3, **तळ मजला, म्हाडा कॉलनी, वाशीनाका** |
| | 173-**चेंबुर** | 10 | **चेंबूर स्टेशन म्युनिसिपल प्राथमिक शाळा संकुल, तळ मजला, हॉल-ब, पी.एल.लोखंडे मार्ग, चेंबूर, मुंबई**-89 |
| | | 47 | **चेंबूर स्टेशन म्युनिसिपल प्राथ. शाळा क्र.**1, 2 **रा मजला, रून नं.** 105 |
| | | 127 | **घाटले अपर प्रायमरी म्युनिसिपल हिंदी शाळा, खोली क्र.** 3, **तळ मजला, घाटला, चेंबूर, मुंबई**-71 |
| | | 219 | **साधु वासवानी हायस्कुल,** 10 **वर्ग,** 1 **ला मजला, खोली नं.**1, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | चेंबूर, मुंबई-74 |
| | | 241 | **श्री. सनातन धर्म विदयालय**, 1 **ला मजला**, **खोली नं.** 112, **आर.सी. मार्ग** (प.), **चेंबूर**, **मुंबई**-74 |
| | | 27 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 1 |
| | | 28 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 2 |
| | | 29 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 3 |
| | | 30 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 4 |
| | | 31 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 5 |
| | | 32 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 6 |
| | | 33 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 7 |
| | | 34 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 8 |
| | | 35 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 9 |
| | | 36 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 10 |
| | | 37 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 11 |
| | | 38 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेलगत असलेले जुने मनपा अधिकाऱ्यांची वसाहत असलेल्या पटांगणात मंडप नं.** 12 |
| **एकूण :-** | | | **65** |

===